मराठी साहित्य, संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन व संवर्धन करण्यासाठी आणि विविध विषयांवरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतरावजी चव्हाण यांची होती. संपूर्ण भारतात राज्य पातळीवर स्थापन करण्यात आलेले साहित्य-संस्कृतीविषयक कार्य करणारे हे पहिलेच मंडळ होय. मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे होते.

१) **मंडळाचे मुख्य उद्दिष्ट**

महाराष्ट्राची संस्कृती, साहित्य आणि इतिहास हे विषय तसेच विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान, समाजविद्या यांच्या कक्षेत येणाऱ्या विषयांवर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. शासनाने मंडळाकडे सोपविलेली वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे. ज्ञान आणि संस्कृतीच्या विकासासाठी साधनस्वरूप व आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान यातील अद्ययावत प्रगतीची माहिती देणारी, मूलभूत ज्ञान देणारी पुस्तके व अभिजात ग्रंथांची भाषांतरे स्वस्त किंमतीत मराठी वाचकांना उपलब्ध करून देण्यावर मंडळाने लक्ष केंद्रित केले आहे. मंडळाच्या साहित्य संवर्धनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी मंडळामार्फत खालील योजना/उपक्रम राबविले जातात :-

(२) **राबविण्यात येणारे प्रमुख कार्यक्रम/योजनांची सविस्तर माहिती**

**अ) योजनेत्तर योजनांची माहिती - (Non-Plan)**

(१) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना - शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला, उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना, महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन व संशोधन, मंडळाची वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरूपाची अन्य प्रकाशने, महाराष्ट्राचे शिल्पकार योजना
(२) ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
(३) नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना
(४) नवलेखकांची चर्चासत्रे/ कार्यशाळांना अनुदान योजना
(५) साहित्य संस्थांना अनुदान
(६) अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान
(७) नियतकालिकांना अनुदान
(८) स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना
(९) विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार
(१०) श्री.पु. भागवत पुरस्कार

**(ब) योजनांतर्गत योजनांची माहिती - (PLAN)**

(१) अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान
(२) मंडळाच्या ग्रंथांचे ई-बुक
(३) नाट्यसंज्ञा कोश
(४) मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास
(५) महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास
(६) महाराष्ट्राच्या दृश्यात्मक कलांच्या परंपरांचा आढावा - बृहद्‌ग्रंथ प्रकल्प

(७) १९ व्या व २० व्या शतकातील अध्यात्म मार्गदर्शकाचा बोध
(८) मराठी सारस्वतांचे चित्र चरित्र
(९) सत्यशोधकांचे अंतरंग
(१०) गुरुवर्य कृ.अ. केळूसकर यांचे समग्र वाङ्मय
(११) सूफी तत्त्वज्ञान : सखोल विश्लेषण - बृहद्ग्रंथ
(१२) भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल - एक दृष्टीक्षेप
(१३) महाराष्ट्राबाहेरील मराठी माणसांच्या कामगिरीचा समग्र आणि सम्यक इतिहास
(१४) अभंगसेतू - संत वचनांचे अनुवाद
(१५) अक्षर बालवाङ्मय : संहिता शोध व बृहद् संदर्भग्रंथ
(१६) नक्षत्र नीलनभीचे - समग्र बालकवी
(१७) महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला : परंपरा आणि नवता (१८५० ते २०१६)
(१८) कवीवर्य नामदेव ढसाळ यांचे समग्र वाङ्मय- बृहद्प्रकल्प
(१९) नागेश विनायक बापट यांचे समग्र वाङ्मय
(२०) मराठीतील बाल साहित्य : इतिहास लेखन आणि समीक्षा संपादन
(२१) आधुनिक महाराष्ट्र : अन्वेषणात्मक कालपट
(२२) महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य, लिंगायत, आनंद व अन्य संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङ्मयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कवितांचे प्रकाशन

## (अ) योजनेतर योजनांची माहिती (Non-Plan)

**१) मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना -**

सदर योजनेमध्ये शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला, उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर, महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन, वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक इत्यादी विषयांवरील ग्रंथ प्रकाशित केले जातात. तसेच मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकांचे मागणीनुसार पुनर्मुद्रणही केले जाते. सदर योजनेनुसार मंडळाने आतापर्यंत ५२२ पुस्तके प्रकाशित केली आहेत.

अ) **शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला -**

शास्त्रीय विषयांचा परिचय करुन देणारी पुस्तके मराठी वाचकांना स्वस्त किंमतीत उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. आतापर्यंत मंडळाने महत्त्वपूर्ण असे शास्त्रीय ग्रंथ प्रकाशित केले आहेत.

ब) **उत्कृष्ट ग्रंथांच्या भाषांतराची योजना-**

मराठीतील व मराठीशिवाय अन्य भाषांमधील विविध विषयांवरील अभिजात वाङ्मयाच्या ग्रंथांनी जगातील वैचारिक साहित्यात मोलाची भर घातली आहे. अशा मौलिक व महत्त्वपूर्ण ग्रंथांची भाषांतरे मराठी भाषेत व मराठी शिवाय हिंदी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध करून द्यावीत, हा या योजनेमागील उद्देश आहे. या योजनेअंतर्गत इंग्रजी, रशियन, फ्रेंच इत्यादि पाश्चात्य व संस्कृत, प्राकृत व यासारख्या भारतीय भाषांतून मंडळाने पुस्तके निवडली असून भाषांतरीत पुस्तके मंडळाने प्रकाशित केली आहेत.

क) **महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी ऐतिहासिक कागदपत्रांच्या संपादन/प्रकाशनाची योजना-**

या योजनेमध्ये महाराष्ट्राच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी उपलब्ध नवीन साधने आणि साहित्य लक्षात घेऊन व अशा अद्यावत साधनसामग्रीचा उपयोग करून आधुनिक इतिहास रचनेच्या तत्त्वानुसार महाराष्ट्राचा

प्रमाणभूत असा सुलभ राजकीय, सांस्कृतिक इतिहास मराठी भाषेत नव्याने संपादित/ प्रकाशित करण्याची ही योजना आहे.

प्रागैतिहासिक कालापासून ते आधुनिक कालापर्यंत साधारणत: प्रत्येकी ५०० पृष्ठांच्या ५ खंडात म्हणजे (१) प्राचीन कालखंड, (२) मध्ययुगीन कालखंड, (३) मराठा कालखंड भाग-१, शिवकाल, (४) मराठा कालखंड भाग-२ पेशवेकाल व (५) आधुनिक कालखंड अशा पाच भागांचा या योजनेत समावेश आहे. यापैकी प्राचीन कालखंड भाग-१, मध्ययुगीन कालखंड भाग-१ (खंड-१ व २), मराठा कालखंड भाग-१ (शिवकाल) व मराठा कालखंड भाग-२, (पेशवेकाल) हे चार खंड प्रकाशित झाले आहेत. आधुनिक कालखंडाच्या लेखनाचे काम डॉ. के.के. चौधरी यांनी पूर्ण केले असून सदर आधुनिक कालखंडावरील 'आधुनिकमहाराष्ट्राचा इतिहास' या पुस्तकाचा पहिला खंड प्रकाशित झाला असून दुसरा खंड छपाईसाठी शासकीय मुद्रणालयास सोपविण्यात आला आहे.

ड) **मंडळाची वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरूपाची अन्य प्रकाशने-**

खाजगी प्रकाशकांमार्फत साधारणत: जी पुस्तके प्रकाशित करण्यास नकार दिला जातो, अशी पुस्तके जिज्ञासू, चोखंदळ तसेच सामान्य वाचकास कमी किमतीत उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकांच्या सहित्याचे पुनर्मुद्रण तसेच समाज परिवर्तन घडविण्यास मदत होऊ शकेल असे थोर विचारवंतांचे वाङ्मय, असामान्य व्यक्तिंची चरित्रे वगैरे या योजनेत प्रकाशित करण्यात येतात. संपूर्ण गडकरी भाग- १, महात्मा फुले समग्र वाङ्मय, लोकहितवादी समग्र वाङ्मय, आगरकर समग्र वाङ्मय खंड १ ते ३, आचार्य भागवतांचे संकलित वाङ्मय, प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय खंड १ ते ५, सांस्कृतिक महाराष्ट्र खंड १ व २, केशवसुतांची कविता (हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती), नामदेव गाथा, भावार्थ रामायण, संत तुकाराम बावांची गाथा (१९५० मध्ये प्रकाशित केलेली) अशा प्रकारची पुस्तके प्रकाशित केली आहेत.

इ) **महाराष्ट्राचे शिल्पकार योजना -**

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या महनीय व्यक्तिंनी भर घातली आहे, त्यांच्या जीवनकार्यावर आधारित साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची चरित्रे "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेंतर्गत पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची ही योजना आहे. आतापर्यंत एकूण ४३ महनीय व्यक्तींची चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत.

२) **ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान**

या योजने अंतर्गत मराठीतील वैचारिक व शास्त्रीय विषयावरील ग्रंथांची उणीव लक्षात घेऊन लिहिलेल्या शास्त्रीय व तांत्रिक विषयावरील वैशिष्ट्यपूर्ण संशोधनात्मक अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा, तसेच ललित साहित्यातील वाङ्मयीन दृष्टीने गुणवत्तापूर्ण असलेल्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

३) **नवलेखक उत्तेजनार्थ अनुदान योजना -**

या योजने अंतर्गत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा नवलेखकांना कथा, कादंबरी, ललितगद्य, काव्य, नाटक (एकांकिका), बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी मंडळाकडून अनुदान दिले जाते.

४) **नवलेखकांची चर्चासत्रे/ कार्यशाळांना अनुदान योजना -**

नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, त्यांच्या लेखनात सुधारणा व्हावी, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित केल्या जातात. मंडळाकडून महाराष्ट्रभर आजमितीपर्यंत ९२ चर्चासत्रे/कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

५) **साहित्य संस्थांना अनुदान**

या अनुदान योजनेतर्गत शासनामार्फत १९८९-९० सालापासून मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी -

१) अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ
२) विदर्भ साहित्य संघ, नागपूर
३) मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद
४) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे आणि
५) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई

अशा ५ संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम ५.०० लाख रुपये अनुदान देण्यात येते. सन १९९३ -९४ पासून कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी व सन २०००-२००१ पासून दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या संस्थांचाही या योजनेत समावेश करण्यात आला आहे.

६) **अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास अनुदान -**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ दरवर्षी साहित्य संमेलन आयोजित करते. या संमेलनासाठी रु. २५.०० लाखाचे अनुदान मंडळामार्फत दिले जाते.

७) **नियतकालिकांना अनुदान -**

विविध विषयांवरील मराठी भाषेत प्रसिध्द होणाऱ्या ४९ नियतकालिकांना प्रतिवर्षी अनुदान वितरित केले जाते.

८) **स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना -**

सन २०१२ पासून राज्य वाङ्मय पुरस्कार योजना सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आली. सदर योजना महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना या नावाने राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत अ) प्रौढ वाङ्मय विभागात २२ वाङ्मय पुरस्कार, ब) बालवाङ्मय विभागात ६ पुरस्कार, क) प्रथम प्रकाशन विभागात ६ पुरस्कार व ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार १ असे एकूण ३५ राज्य वाङ्मय पुरस्कार मंडळाच्यावतीने प्रदान केले जातात.

९) **ज्येष्ठ साहित्यिकास विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार -**

साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या नामवंत ज्येष्ठ साहित्यिकास, ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक, कै. विंदा करंदीकर यांच्या नावे जीवन गौरव पुरस्कार मंडळाच्यावतीने सन २०१२-१३ पासून प्रदान करण्यात येत आहे. या पुरस्काराचे स्वरूप रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

१०) **श्री.पु. भागवत पुरस्कार –**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून साहित्य निर्मिती क्षेत्रात लक्षणीय व उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रकाशन संस्थेस मराठी प्रकाशन व्यवसायात मोलाचे कार्य करणारे श्री.पु. भागवत यांच्या नावे दरवर्षी पुरस्कार देण्यात येतो. या पुरस्काराचे स्वरूप रु. ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त) रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

**(ब) योजनांतर्गत योजनांची माहिती - (PLAN)**

१) **अन्य मराठी साहित्य संमेलनाना अनुदान योजना** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून दरवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास रु.२५.०० लाखाचे अनुदान दिले जाते. या मुख्य साहित्य संमेलनाप्रमाणेच मुख्य मानल्या गेलेल्या प्रवाहापेक्षा वेगळया प्रवाहातील जनसमुहांच्या आणि उपेक्षित वर्गांच्या अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान देण्यात यावे, या सांस्कृतिक धोरणातील सूचनेनुसार मंडळाकडून दरवर्षी रु.२.०० लाखाचे अनुदान अन्य संमेलनांना देण्यात येते.

२) **मंडळाच्या ग्रंथांचे ई-बुक** - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने मराठी भाषा, संस्कृती, विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान व समाजविद्या यासारख्या विविध विषयांवर आजमितीपर्यंत ५१४ ग्रंथ प्रकाशित केले आहेत. त्यापैकी ४४४ पुस्तके ई-बुक करण्यासाठी सी-डॅक, पुणे या संस्थेकडे सोपविण्यात आली आहेत. सदर काम डिसेंबर २०१७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

३) **नाट्यसंज्ञा कोश** - 'नाटक' या वाङ्मय प्रकाराच्या आकलनासाठी, विश्लेषणासाठी आणि मूल्यमापनासाठी वापरल्या जाणाऱ्या संज्ञा सदर ग्रंथात समाविष्ट करण्यात येणार आहेत. हा प्रकल्प प्रा. विलास खोले यांजकडे सोपविला आहे.

४) **मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास** - सदर प्रकल्पाच्या माध्यमातून मराठी नाटक आणि रंगभूमीचा समग्र इतिहास मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाचे लेखन काम प्रा. दत्ता भगत यांनी पूर्ण केले असून सदर प्रकल्प छपाईसाठी शासकीय मुद्रणालयास लवकरच सोपविण्यात येणार आहे.

५) **महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक स्थित्यंतराचा इतिहास** - या प्रकल्पात आधुनिक महाराष्ट्राचे राजकीय स्थित्यंतर, आर्थिक स्थित्यंतर, सामाजिक स्थित्यंतर, शैक्षणिक स्थित्यंतर, धार्मिक स्थित्यंतर, सांस्कृतिक स्थित्यंतर, भाषा व्याकरण व साहित्यातील स्थित्यंतरे, विज्ञान व तंत्रज्ञान, माध्यम संस्कृती, क्रिडा संस्कृती, न्यायव्यवस्था, कायदा आणि सुरक्षा इत्यादी घटकातील स्थित्यंतरे या सर्व बाबींचा सर्वंकष आढावा घेण्यात येणार असून सदर प्रकल्प मंडळाच्यावतीने ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प लेखनासाठी ज्येष्ठ अभ्यासक श्री. रमेश वरखेडे यांजकडे दिनांक १६/४/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला आला असून सदर प्रकल्प तीन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

६) **महाराष्ट्राच्या दृश्यात्मक कलांच्या परंपरांचा आढावा - बृहद्ग्रंथ** - सदर प्रकल्पामध्ये महाराष्ट्राच्या सध्याच्या भौगोलिक सीमारेषांमधील विदर्भातील अमरावती व कोकणात सापडलेल्या सुमारे इ.स. पूर्व २५००० या काळातील गुफाचित्रांपासून ते २१ व्या शतकातील आधुनिक व उत्तर आधुनिक दृष्यकलेचा आढावा घेण्यात येणार आहे. या प्रकल्पात प्रामुख्याने चित्र-शिल्पकलेचा आढावा घेत असतानाच आदिवासी, ग्रामीण व नागर या तीनही संस्कृतीतील कारागीरीच्या अंगाने जाणाऱ्या जीवनोपयोगी वस्तू, दागिने व पात्रे इ. विषयांसंदर्भात लेखन करण्यात येणार आहे. सदर प्रकल्प मंडळामार्फत ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यात येणार असून हा प्रकल्प लेखनासाठी ज्येष्ठ अभ्यासक श्री. सुहास बहुळकर यांजकडे दिनांक १६/४/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

७) **१९ व्या व २० व्या शतकातील अध्यात्म मार्गदर्शकांचा बोध -** या प्रकल्पात महाराष्ट्राच्या भूमीशी संबंधित अध्यात्म मार्गदर्शकांचा बोध मांडण्यात येणार आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्र राज्य आजच्या स्वरुपात नव्हते, त्यामुळे कर्नाटक व मध्य प्रांतातील मराठी अध्यात्म मार्गदर्शकांचाही अंतर्भाव सदर प्रकल्पात असेल. सदर प्रकल्प मंडळाच्या वतीने ग्रंथरुपाने प्रकाशित करण्यात येणार असून हा प्रकल्प लेखनासाठी संत साहित्याचे अभ्यासक श्री. उमेश करंदीकर यांजकडे दिनांक २१/४/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

८) **मराठी सारस्वतांचे चित्र चरित्र -** सदर प्रकल्पाच्या माध्यमातून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती वृध्दींगत करण्यासाठी ज्या साहित्यिक-सारस्वतांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे असे साहित्यिक विस्मरणात जाऊ नयेत आणि नव्या पिढीला त्यांची ओळख असावी, या हेतुने अशा साहित्यिकांच्या चित्र चरित्राची माहिती अंतर्भूत असलेला बृहद्ग्रंथ मंडळाच्या वतीने प्रकाशित केला जाणार आहे. सदर प्रकल्प लेखनार्थ श्री. प्रकाश एदलाबादकर यांजकडे दिनांक १६/४/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

९) **सत्यशोधकांचे अंतरंग** - हा प्रकल्प सत्यशोधक समाज चळवळीतील, सत्यशोधक कार्यकर्ते, पुढारी यांच्या कार्याचे सत्यशोधकी दृष्टीकोनातून संशोधन करून, विश्लेषणात्मक तपशीलवार पट मांडणारा वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प असेल. हा प्रकल्प लेखनासाठी ज्येष्ठ अभ्यासक श्री. जी.ए. उगले यांजकडे दिनांक १६/४/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला होता. सदर प्रकल्पाचे हस्तलिखित श्री. जी.ए. उगले यांनी मंडळास सादर केले असून सदर हस्तलिखित छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे सोपविण्यात आले आहे.

१०) **महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय** :- गुरुवर्य कृष्णराव केळूसकरांनी धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान या गहन विषयांवर अत्यंत अभ्यासपूर्ण आणि मौलिक स्वरुपाचे लेखन केले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून गुरुवर्य कृष्णराव केळूसकर यांची प्रकाशित व अप्रकाशित अशी सर्व वाङ्मय संपदा मंडळाच्यावतीने बृहतस्वरूपात वाचकांसमोर आणली जाणार आहे. हा प्रकल्प संपादनासाठी ज्येष्ठ अभ्यासक डॉ. राजन गवस यांजकडे दिनांक १६/४/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

११) **सूफी तत्त्वज्ञान : सखोल विश्लेषण - बृहद्ग्रंथ** - सूफी तत्त्वज्ञानाच्या प्रारंभीच्या अवस्थेपासून ते विकास काळापर्यंतच्या दार्शनिक वैशिष्ट्यांचा सर्वंकष सविस्तर आढावा घेऊन भारतीय तत्त्वज्ञान आणि सूफी तत्त्वज्ञान अंतर्भूत असलेला बृहद् ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सदर प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प लेखनासाठी ज्येष्ठ अभ्यासक डॉ.मुहम्मद आजम यांजकडे दिनांक ७/७/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला होता. सदर प्रकल्पाचे हस्तलिखित डॉ. आजम यांनी मंडळास सादर केले असून सदर हस्तलिखित छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे लवकरच सोपविण्यात येणार आहे.

१२) **भारतातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक वाटचाल - एक दृष्टीक्षेप** - सदर प्रकल्पात भारतातील प्राचीन ग्रंथालय परंपरेचा आढावा घेतला जाणार असून भारतातील मध्ययुगीन ग्रंथालयांची निर्मिती व वाटचाल यांचा देखील अभ्यास केला जाणार आहे. सदर प्रकल्प ग्रंथरुपाने मंडळाच्यावतीने प्रकाशित केला जाणार असून सदर ग्रंथ छायाचित्रे, स्थळदर्शक नकाशे व दुर्मिळ साहित्यसूची इत्यादींनी युक्त असेल. सदर प्रकल्प लेखनासाठी ज्येष्ठ अभ्यासक श्री.जी.ए. बुवा यांजकडे दिनांक १७/५/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला होता. सदर प्रकल्प श्री.जी.ए. बुवा यांनी पुर्ण करून मंडळास सादर केला असून सदर प्रकल्प छपाईसाठी शासकीय मुद्रणालयाकडे लवकरच सोपविण्यात येणार आहे.

१३) **महाराष्ट्राबाहेरील मराठी माणसांच्या कामगिरीचा समग्र आणि सम्यक इतिहास -** महाराष्ट्राचा इतिहास हा फक्त महाराष्ट्रापुरताच मर्यादित न रहाता महाराष्ट्राबाहेरही विशेष उल्लेखनीय असा आहे. त्यामुळे महाराष्ट्राबाहेरील मराठी माणसांच्या कामगिरीचा समग्र आणि सम्यक इतिहास वाचकांसाठी उपलब्ध करून देण्याकरिता सदर प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प लेखनार्थ डॉ. सदानंद मोरे यांजकडे दिनांक २९/७/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१४) **अभंगसेतू - संत वचनांचे अनुवाद -** महाराष्ट्राला दीर्घ अशी संत परंपरा लाभली आहे. या परंपरेने मराठी साहित्याला व संस्कृतीला आकार दिला आहे. महाराष्ट्राप्रमाणेच देशातील अन्य राज्यातही संत परंपरा विकसीत झालेली दिसून येते. या साऱ्याच संत परंपरेचा समाज जीवनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला आहे. संतांच्या चळवळीने सामाजिक लोकशाहीकडे जाण्याचा मार्ग प्रशस्त केला आहे. संतांचे विचार हे प्रबोधनाचे विचार असून आजच्या काळातही उपयुक्त आहेत. ही उपयुक्तता लक्षात घेऊन महाराष्ट्रातील निवडक संतांच्या विचारांचा अनुवाद हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये करणे आणि अन्य राज्यातील संतांचे विचार मराठीमध्ये अनुवादित करणे यासाठी अभंगसेतू - संत वचनांचे अनुवाद हा प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प लेखनार्थ श्री.रवींद्र गोळे यांजकडे दिनांक ५/८/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१५) **अक्षर बालवाङ्मय : संहिता शोध व बृहद् संदर्भग्रंथ -** मराठी संस्कृतीच्या भावनिक, बौध्दिक व सांस्कृतिक समृध्दीसाठी मुलांना सकस बाल साहित्य उपलब्ध करुन देण्याची निकड लक्षात घेऊन बदलत्या जीवनसंदर्भाच्या पार्श्वभूमीवर बालकुमारांना विविध विषयांवर माहितीपर व सृजनशील साहित्य वाचायला मिळावे यासाठी सदर प्रकल्प मंडळाने हाती घेतला आहे. त्या अनुषंगाने मराठीतील अक्षर बालवाङ्मयाबरोबरच, भारतीय भाषांतील व जागतिक वाङ्मयातील निवडक बालकुमार साहित्य वाचकांना उपलब्ध करून देण्यासाठी 'अक्षर बालवाङ्मय : संहिता शोध व बृहद् संदर्भग्रंथ' हा प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प संपादनार्थ श्रीमती मंगला वरखेडे यांजकडे दिनांक १४/७/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प तीन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१६) **नक्षत्र नीलनभीचे - समग्र बालकवी -** मराठी साहित्यातील निसर्ग कविता लिहिणाऱ्या कवींमध्ये त्र्यंबक बापूजी ठोंबरे अर्थात बालकवी हे मराठी साहित्य सृष्टीतील एक सर्वश्रेष्ठ निसर्ग कवी होत. बालकवी यांच्या स्मृतीशताब्दी निमित्त बालकवींच्या लेखनाचा समग्र आढावा घेणारा कॉफीटेबल बुकसदृश ग्रंथ सचित्र व रंगीत स्वरूपात प्रकाशित करण्यासाठी 'नक्षत्र नीलनभीचे - समग्र बालकवी' हा प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प संपादनार्थ श्री. सुधीर जोगळेकर यांजकडे दिनांक ६/९/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१७) **महाराष्ट्राच्या प्रयोगात्म लोककला : परंपरा आणि नवता (१८५० ते २०१६) -** महाराष्ट्राला समृध्द लोकसंस्कृतीचा वारसा लाभला असून या लोकसंस्कृतीमध्ये प्रयोगात्म लोककलांना अनन्य साधारण महत्त्व आहे. अशा या प्रयोगात्म लोककलांची परंपरा आणि विविध सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरामुळे या कलांमध्ये आलेली परिवर्तने व या प्रयोगात्म लोककलांनी केलेला नवतेचा स्वीकार या सर्व बाबींचा समग्र आढावा घेणारा बृहद् ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी 'महाराष्ट्राच्या प्रयोगात्मक लोककला : परंपरा आणि नवता (१८५० ते २०१६) हा प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प लेखनार्थ

डॉ. प्रकाश खांडगे यांजकडे दिनांक २/९/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दीड वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१८) **कवीवर्य नामदेव ढसाळ यांचे समग्र वाङ्मय -** मराठी साहित्यात आपल्या चतुरस्त्र प्रतिभेने ज्यांनी एक सांस्कृतिक, वैचारिक मन्वंतरच घडवून मराठी साहित्याला एक नवे परिमाण व नवा आयाम दिला त्या पद्मश्री नामदेव ढसाळ यांचे सर्व वाङ्मय संपादित करून समग्र स्वरूपात प्रकाशित करण्यासाठी 'समग्र नामदेव ढसाळ' हा प्रकल्प मंडळाच्यावतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प संपादनार्थ श्रीमती मलिका अमर शेख यांजकडे दिनांक ०६/१०/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प एक वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

१९) **नागेश विनायक बापट यांचे समग्र वाङ्मय :** नागेश विनायक बापट हे १९ व्या शतकातील मराठीतील एक प्रथितयश चरित्रकार व ऐतिहासिक कादंबरीकार आहेत. मराठी ऐतिहासिक कादंबरीच्या विकासात नागेश विनायक बापट यांच्या कादंबरी लेखनाचा फार मोठा वाटा आहे. नागेश विनायक बापट यांनी ऐतिहासिक कादंबरी आणि चरित्र या वाङ्मय प्रकारात महत्त्वाची भर घातली आहे. नागेश विनायक बापट यांच्या कादंबऱ्या व त्यांचे इतर समग्र साहित्य वाचकांना, अभ्यासकांना सहजपणे उपलब्ध व्हावे यासाठी हा प्रकल्प मंडळाच्या वतीने हाती घेण्यात आला आहे. हा प्रकल्प संपादनार्थ डॉ. नीलकंठ बापट यांजकडे दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

२०) **मराठीतील बाल साहित्य : इतिहास लेखन आणि समीक्षा संपादन -** मराठी बालसाहित्याचा समग्र इतिहास अद्याप लिहिला गेला नाही. तसेच बालसाहित्याविषयी निरनिराळ्या कालखंडात वैचारिक चर्चा - समीक्षा झाली आहे, त्या संहिता आज एकत्रितपणे उपलब्ध नाहीत. ही उणीव भरून काढण्यासाठी प्रस्तुत प्रकल्प महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने हाती घेण्यात आला असून सदर प्रकल्प पुस्तक रुपाने प्रसिद्ध केला जाणार आहे. हा प्रकल्प तज्ज्ञांकडे लवकरच सोपविण्यात येणार आहे.

२१) **आधुनिक महाराष्ट्र : अन्वेषणात्मक कालपट -** सदर प्रकल्पात आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक व वाङ्मयीन घटना घडामोडींचा सलग व समग्र कालपट विस्तृत रुपात मांडण्यात येणार असून सदर प्रकल्प पुस्तक रुपाने प्रसिद्ध करण्यात येणार आहे. हा प्रकल्प संपादनार्थ डॉ. प्रदिप कर्णिक यांजकडे दिनांक १७/०४/२०१७ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

२२) **महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य, लिंगायत, आनंद व अन्य संप्रदायांच्या मध्ययुगीन वाङ्मयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कवितांचे प्रकाशन -** सदर प्रकल्पाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील नाथ, महानुभाव, वारकरी, दत्त, गाणपत्य, चैतन्य, लिंगायत, आनंद व अन्य संप्रदायांची मध्ययुगीन वाङ्मयातील अप्रकाशित व असंग्रहित स्फुट कविता संपादित करून ग्रंथरुपाने प्रकाशित केली जाणार आहे. हा प्रकल्प संपादनार्थ डॉ. सतीश बडवे यांजकडे दिनांक १७/०४/२०१७ रोजीच्या सामंजस्य करारान्वये सोपविण्यात आला असून सदर प्रकल्प दोन वर्षाच्या कालावधीमध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.